# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे - ४०११०१ दुरध्वनी क्र. २८१८११८२, २८१९२८२८.


25 वर्षे विकासाची

"माझे शहर, माझा अभिमान"

जा.क्र.मनपा/कर/ ९८९ /२५-२६ दि. २४/३ /२०२६

प्रति,
जनसंपर्क अधिकारी
जनसंपर्क विभाग

विषय :- मालमत्ता कर वाजवी भाडेमूल्य दराची प्रसिद्धी करणे बाबत.

मा. महासभा ठराव क्र. १० दि. १८/०२/२०२६ अन्वये दि. ०१/०४/२०२६ पासून नव्याने कर आकारणी साठी येणाऱ्या मिळकतींकरीता प्रति चौरस फुटास वाजवी भाडयाच्या दरात वाढ करणेस मंजूरी दिलेली आहे.

त्याअनुषंगाने याबाबतची व्यापक प्रसिद्धी करणे करीता प्रेस नोट तयार करण्यात आले असून सदर प्रेसनोट वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात यावे.

तसेच सदरची माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळ आणि सर्व सामाजिक प्रसार माध्यमांवर प्रसिद्ध करण्यात यावे.

सोबत :- प्रेसनोट.

(प्रणाली घोंगे)
उप-आयुक्त (कर)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

"माझे शहर, माझा अभिमान"

## // जाहिर सुचना //

सर्व नागरीकांना या जाहिर सुचनेव्दारे सुचित करण्यात येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ नियम ७ नुसार दरमहा प्रती चौरस फुटास बांधकामाचे क्षेत्र व प्रकार नुसार वाजवी भाडे दर ठरविण्यात आलेल्या व दि. ३१/०३/२०२६ अखेर सध्या अस्तित्वात असलेल्या वाजवी भाडयाच्या दरामध्ये मा. महासभा ठराव क्र. १० दि. १८/०२/२०२६ अन्वये दि. ०१/०४/२०२६ पासून नव्याने कर आकारणीसाठी येणाऱ्या मिळकतींचे प्रति चौरस फुटास वाजवी भाडयाच्या दरामध्ये खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे वाढ करणे बाबत मान्यता दिलेली असून दि. ०१/०४/२०२६ पासून नव्याने कर आकारणीसाठी येणाऱ्या सर्व मिळकतींस सुधारित दराने कर आकारणी करणेत येणार आहे.

सदरचे दर हे केवळ दि. ०१/०४/२०२६ नंतर अस्तित्वात येणाऱ्या नविन मालमत्तांकरीता असून यापूर्वी कर आकारणी झालेल्या मालमत्तांना सदरचे दर लागू नाही. याबाबतची माहिती नागरीकांना होण्यासाठी सदर जाहिर सुचना प्रसिद्धीस दिले आहे.

| अ. क्र. | विभागाचे नाव | इमारतीचा प्रकार | प्रति चौरस फुट प्रति महिना दि. ०१/०४/२६ पासून नविन दर | |
|---|---|---|---|---|
| | | | निवासी | बिगर निवासी |
| १ | मिरा रोड (पुर्व), भाईंदर पुर्व व पश्चिम, घोडबंदर काशिमिरा, मिरा, पेणकरपाडा, महाजनवाडी चेणे, वर्सोवा सर्व महामार्गालगत, राई, मुर्धे, डोंगरी चौक, पाली, मोर्वा, उत्तन | अ- आर. सी. सी., लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. ४.०० | रु. ६.०० |
| | | ब- माती विटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ३.७५ | रु. ६.०० |
| | | क- भिंतो, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ३.०० | रु. ६.०० |
| २ | चेणे, वर्सोवा, काजुपाडा सर्व गावठाण | अ- आर. सी. सी., लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. ३.५० | रु. ६.०० |
| | | ब- माती विटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ३.२५ | रु. ६.०० |
| | | क- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ३.०० | रु. ६.०० |
| ३ | काजूपाडा चेण, वर्सोवा, माश्याचा पाडा, काशी, मिरा-गावठाण, महाजनवाडी, घोडबंदर, आदिवासी पाड्यामधील आदिवासी निवासी कुटुंबे. | ब- माती विटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु. ०.७५ | - |
| | | क- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु. ०.७५ | - |
| ४ | मोठमोठी हॉटेल्स, रिसॉर्ट, सिनेमागृह मॉल्स, शॉपींग सेंटर इ. (फक्त वाणिज्य वापराकरीता असलेले) | अ- आर. सी. सी., लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | - | रु.७.५० |
| ५ | हॉटेल सह लॉजींग बोर्डींग,सार्व. हॉल, मंगल कार्यालये, लॉन्स, | अ- आर. सी. सी., लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | - | रु.७.५० |
| ६ | व्यावसायीक वापर असलेल्या मोकळया जागा | | - | रु. १.५० |
| ७ | महानगरपालिका क्षेत्रातील शाळा/ कॉलेज/ शैक्षणिक संस्था | अ- आर. सी. सी., लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु. ४.०० | रु. ६.०० |

तरी, कृपया सर्व मालमत्ता धारकांनी याची नोंद घेऊन कर आकारणी न झालेल्या, वाढीव बांधकाम केलेल्या, मोकळया जागा असलेल्या, वापरात बदल केलेल्या मिळकतींची कर आकारणी करुन घ्यावी ही विनंती आहे.

(राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से.)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका